# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-९१ दिनांक - १४/०३/२०२४

## सांबर या वन्य प्राण्याचे शिंग विक्री करण्याच्या उद्देशाने आलेल्या ०२ आरोपीतांना अटक करुन त्यांच्याकडुन ६०,००,०००/- (साठ लाख) रुपये किंमतीचे सांबर या वन्य प्राण्याचे दोन शिंग जप्त करण्यास पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १२/०३/२०२४ रोजी १६:०० वा. चे सुमारास ॲपल इंन्डस्ट्री, पेल्हार नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे दोन इसम त्यांचे कब्जात विना परवाना बेकायदेशिर रित्या काळविट या वन्य प्राण्याच्या शिंगाची विक्री करण्याकरीता येणार असल्याची गुप्त बातमीदाराकडून खात्रीशिर माहिती पेल्हार पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक / सोपान पाटील यांना मिळाली होती. त्यांनी सदरबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांना माहिती दिली असता मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी सदर बाबत खात्री करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते.

सदर आदेशान्वये सहा. पोलीस निरीक्षक सोपान पाटील, पोउपनिरी तुकाराम भोपळे, तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी ॲपल इंन्डस्ट्री, पेल्हार नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर येथे सापळा रचुन काळविट या वन्य प्राण्याच्या शिंगाची विक्री करण्यास आलेल्या आरोपीत १) मोहम्मद इम्रान फरियादअली शाह, वय ४२ वर्षे, रा. वसई पश्चिम ता. वसई जि. पालघर, २) अशोक विरजीभाई पटेल, वय ५८ वर्षे, रा. वसई पुर्व. ता. वसई जि. पालघर यांना ताब्यात घेऊन त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात असलेल्या बजाज कंपनीची रिक्षा क्र. एम एच ४८ एक्स ३४७१ हिच्यामध्ये काळविट या वन्य प्राण्याचे ५०,००,०००/- रुपये किंमतीचे एक शिंग मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यातुन एक बजाज कंपनीची रिक्षा, व दोन मोबाईल फोन असा एकुण ५१,२०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन तो जप्त करण्यात आला आहे. आरोपीत यांच्या ताब्यात मिळुन आलेले शिंग हे नक्की कोणत्या प्राण्याचे आहे याबाबत मा. वैद्यकीय अधिकारी साो, पशु चिकीत्सक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली पुर्व मुंबई यांच्याकडुन लेखी अभिप्राय घेण्यात आला असुन त्यांनी सदरचे शिंग हे सांबर हया वन्य प्राण्याचे असल्याबाबत अहवाल दिला आहे. सदरचे शिंग हे सांबर या वन्य प्राण्याचे असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्याने आरोपीत यांच्या विरोधात पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा. रजि. क्र. ३००/२०२४ वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे कलम ९, ३९, ४४, ४८ सह भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१)(ड),२६(१)(आय) ६५ अन्वये दिनांक १२/०३/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटक आरोपीत क्र. ०१ याच्याकडुन सदर गुन्हयाचे तपासात दिनांक १३/०३/२०२४ रोजी १०,००,०००/- रुपये किंमतीचे आणखी एक शिंग जप्त करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त सो, मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ - ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पेल्हार पोलीस ठाणे, व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनि/ तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, पोहवा/तानाजी चव्हाण, पोहवा/अनिल शेगर, पो.अं. वाल्मिक पाटील, मिथुन मोहिते, संजय मासाळ, रवि वानखेडे, किरण आव्हाड, निखील मंडलिक, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




**----**

**0000----**